# महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदयाअंतर्गत काम करणाऱ्या मजुरांचे अध्ययन

**विशेष संदर्भ :-जिवती तालुक्यातील केळेझारी गावातील रोजगार हमी कायदयाअंतर्गत काम करणारे मजुर लाभार्थी.**

**डॉ. सुभाष आर. गिरडे**
सहाय्यक प्राध्यापक
एस. आर. एम. कॉलेज ऑफ सोशल पडोली चंद्रपूर
Mob. No. - 9423961388
Email - girdelic@gmail.com

---

**प्रस्तावना :**

रोजगार हमी योजनेची सुरूवात १९६२ पासून महाराष्ट्रात झाली. याच सुरूवातीला इंग्रजी भाषेमध्ये इ.जि.एस. असे नाव होते. गरजू व्यक्तींना अशाप्रकारे त्यांच्या परिसरात रोजगार हमी देतानाच त्यातून गाव विकासाची कामे घडविण्याच्या व्यवस्था करण्यासाठी कायदा करणारे महाराष्ट्र हे देशातील नव्हे तर जगातील पहिले राज्य आहे. १९६२ साली पडलेल्या भयंकर दुष्काळाने महाराष्ट्र शासनाने पहिल्यादाच ग्रामीण भागातील कामे काढून त्यावर लोकाना रोजगार उपलब्ध करून दिला. तेव्हाच्या चळवळीची मागणी आणि विधानसभेचे तेव्हाचे सभापती वि.स. पांगे यांच्या व इतर अनेक व इतर अनेक राजकीय नेत्यांच्या प्रयत्नामुळे महाराष्ट्र शासनाने १९६६ साली मागेल त्याला / तीला मागेल तेवढे काम आणि त्या कामाचा किमान समान दान देणारा ''रोजगार हमी कायदा'' केला त्यामुळे तीस वर्षपेक्षा जास्त काळ आपल्या राज्याने या कायदयाची अंमलबजावणीत अनेक विकृतीने शिरकाव केलेला असला तरी जिथे जिथे सरकारी अधिकारी कर्मचारी, सामाजिक संस्था, संघटना आणि लोकांना जागरूकतेने व एकत्रीतपणे प्रयत्न केले आहेत. तिथे तिथे या योजनेमुळे शेतकऱ्यांचा तसेच शेतमजुरांना भरीव फायदा झालेला आहे. नंतर भुकबळी व दारिद्रय निमुर्लन करण्यासाठी केंद्र स्तरावर दि. ०२ फेबुवारी २००६ ला आंध्रप्रदेश राज्यातील राज्यातील अनंतपुर या जिल्हयातील पदलापल्ली या ग्रामपंचायत मधून या कायदयाची सुरूवात करण्यात आली सुरूवातीला २०० जिल्हयामध्ये का कायदा लागू करण्यात आला. २००८ पर्यंत टप्याटप्याने सर्वच राज्यांना लागू केला गेला नंतर काही दिवसाच्या कालावधीनंतर महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा असे नामकरण करण्यात आले.

या योजनेत मजुरांना कामे धरण, कालवे, सार्वजनिक बांधकाम अश्या ठिकाणी दिल्या जात होते. त्या कामाच्या मोबदल्यात धान्य दिल्या जात असे या योजनेमुळे दुष्काळी परिस्थितीला तोंड देण्यात आले. प्रत्येकी १८ वर्षावरील ग्रामीण व्यक्तीला या योजनेमुळे रोजगाराची संधी उपलब्ध होत आहे. महाराष्ट्रातील या योजनेला असलेला प्रतिसाद पाहून शेजारातील राज्य आंध्रप्रदेश येथे सुध्दा म. ग्रामीण रोजगार योजना सुरू करण्यात आली. योजनेमुळे ग्रामीण जनतेला होणारा प्रतिसाद पाहुन छत्तीसगढ इतर काही राज्यामध्ये सुध्दा योजना सुरू



Research Hub International Journal

करण्यात आली. ग्रामीण जनतेच्या वाढत्या बेराजगारीचे प्रमाण व म. ग्रामीण रोजगार हमी योजना ही काही राज्यात सुरू असल्याने त्या योजनेला मिळालेला प्रतिसाद लक्ष्यात घेता भारत सरकारणे महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी कायदा २००५ साली भारतीय संसदेत पास केला. भारतीय द्रारिदय रेषेखालील असलेली जनता व भुकमारीने मृत्यूमुखी पडत असलेल्या लोकांना रोजगाराची संधी उपलब्ध व्हावी. यासाठी हक्काची योजना करण्यात आली. ही योजना ग्रामीण जनतेच्या लोकांसाठी ही योजना ग्रामीण क्षेत्रात प्रत्येक अश्या व्यक्तीस जे अकुशल शारिरिक कार्य करण्यात स्वईच्छेने समोर नेण्यास प्रत्येक आर्थिक वर्षात कमीत कमी शंभर दिवसाची गारंटीकृत रोजगार उपलब्ध करून देत असते.

केंद्रीय मंत्रीमंडाने असे म्हटले आहे की, महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी ही जगातील सर्वात मोठी योजना आहे. कारण ही योजना १८ वर्षावरील प्रत्ये ग्रामीण व्यक्तीला १५ दिवसाच्या आत ग्रामपंचायत रोजगार उपलब्ध करून देत असते. रोजगार हा गावात ५ कि.मी. अंतरावर दिला जातो. जर ५ कि.मी. पेक्षा जास्त अंतरावर काम असलयास कामगारास जाण्यायेण्यासाठी आर्थिक मदत दिली जाते. तसेच काम करण्यास कामगारास साधनसुध्दा उपलब्ध करून दिल्या जाते. तसेच काम न मिळाल्यास बेरोजगार भत्ता सुध्दा देण्यात येतो.

**ठतिहास :**

महाराष्ट्र राज्याच्या कायदयाच्या धर्तीवर करतांनाच केंद्र शासनाने त्यातील काही तरतुदीमध्ये बदल केले आणि काही नवीन तरतुदींचा समावेश केला महाराष्ट्र राज्याने जुन्या रोजगार हमी कायदयाची तरतुद आणि केंद्र शासनाच्या ‘‘महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा’’ तयार केला. २००८ पासुन हा कायदा राज्यातील सर्व जिल्हयामध्ये लागू झालेला आहे. २०१३ पर्यंत जुन्या व नव्या अश्या दोन्ही तरतुदीची अंमलबजावणी सुरू झालेली होती. परंतु २०१३ पासून नव्या म्हणजे रोजगार हमीच्या सुधारीत आवृत्तीची अंमलबजावणी सुरू झालेली आहे.

- केंद्र व राज्य शासनाच्या निधीतून वर्षभराची हमी प्रत्येक कुटूंबाला १०० दिवस रोजगार उपलब्ध करून देण्यासाठीचा निधी केंद्र शासन पुरवित महाराष्ट्रात मात्र राज्य शासन त्यापलीकडे प्रत्येक व्यकीला वर्षभरात जेवढे काम हवे असेल तेवढे काम उपलब्ध करून देण्यासाठीचा निधी देते. म्हणजेच केंद्र शासनाच्या कायदयानुसार प्रत्येक कुटूंबाला १०० दिवसाची हमी असली तरी महाराष्ट्रात मात्र राज्य शासनाने देखिल निधी उपलब्ध देण्याचे मान्य केल्याने ग्रामीण भागातील अंगमेहनतीने अकुशल काम करू ईच्छिनाऱ्या प्रत्येक व्यक्तीला वर्षभरात हवे तेवढे दिवस रोजगार मिळू शकतो. महाराष्ट्र राज्य हे भारतातील एकमेव राज्य आहे. की जे ३६५ दिवस कामाची हमी देतो. आजमितीस ग्रामपंचायतीना विकासाची कामे करण्यासाठी उपलब्ध असलेल्या सर्वात मोठा निधी हा महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमीतूनच उपलब्ध होतो.

- **ग्रामीण मजुरांना रोजगार हमी आणि उत्पादक कामांची निर्मिती** :

या कायदयानुसार ग्रामीण भागातील १८ वर्षे पुर्ण झालेल्या आणि अंगमेहनतीचे अकुशल काम करायला तयार असण्याऱ्या प्रत्येक व्यक्तीला किमान वेतन दराने मजुरी मिळण्याची हमी आहे. जर ८ किमी

पेक्षा लांब अंतरावर कल असेल तर त्यासाठी किमान मजुरी दराच्या १० टक्के एवढी रक्कम प्रवासभत्ता म्हणून देण्याची तरतुद ही कायदयाने केलेली आहे. महत्वाचे म्हणजेच स्त्री आणि पुरूषांना समान वेतन मिळण्याचा नियम आहे. सध्या जानेवारी २०२० पासून प्रतिदिन २३८ रू. व मजुरीचा दर आहे. या कायदयाच्या अंतर्गत होणारी बहुसंख्य कामे ही अंगावरची कामे असल्याने जेवढे काम तेवढे दाम अश्याप्रकारे मोजमाप होते आणि प्रत्येक प्रकारच्या कामाचे दर नोंदवलेले 'दरपत्रक' त्यासाठी वापरले जोते. मात्र दरपत्रकातील दर काहीही असले तरी मजुरांनी विश्रांतीचा एक तास धरून सलग सात तास केले तर त्यांना किमान मजुरीची रक्कम मिळालीच पाहिजे. असा नियम आहे. हे दरपत्रक ग्रामपंचायतीमध्ये असायला पाहिजे, गावातील गरीब, वंचीत कुटूंबाच्या उपजिविका सुरक्षीत करणे. त्याचप्रमाणे रोजगार निर्मितीसाठी काढल्या जाणाऱ्या कामामधून दुष्काळावर प्रतिबंधात्मक उपाय करणे गावातील व परिसरातील नैसर्गिक संसाधनाचे जतन करणे असे या कायदाचे बहुपदरी उद्देष्टये आहे. हे उदिष्टय पुर्ण करण्यासाठी सार्वजनिक तसेच वैयक्तीक लाभाचे कामे काढण्यासाठी वैशिष्टयपूर्ण तरतुद या कायदयाने केली आहे.

- **पंचायत राज संस्थाना महत्वाची भुमिका :**

रोजगार हमी योजनेच्या सुधारीत रूपानुसार म्हणजे २००८ पासून पंचायत राज संस्थाना (जिल्हा परिषद, पंचायत समिती, ग्रामपंचायत) त्यातही ग्रामपंचायतींना अतिशय महत्वाची भुमिका मिळालेली आहे. किंबहुना, ग्रामपंचायतीच्या सहभागावरच या कायदयाचे यश व अपयश अवलंबून आहे. केंद्र शासनाने प्रत्येक ग्रामपंचायतीसाठी उपलब्ध करून दिलेल्या निधीपैकी किमान ५० टक्के निधी ग्रामपंचायतींना खर्च करायची आहे. म्हणजेच ५० टक्के खर्च होईल एवढया कामांची अंमलबजावणी ग्रामपंचायतीने करायची आहे.

ग्रामपंचायतीला ''अंमलबजावणी यंत्रणा'' म्हणून मान्यता देणे आणि त्यासाठी खर्च करायला भरीव निधी उपलब्ध करून देणे हे या कायदयाचे फार मोठे वैशिष्टये आहे. २००६ पासून महसुल विभागाबरोबर जिल्हा परिषद व पंचायत समिती या यंत्रणानाही योजनेचे नियोजन व अंमलबजावणी आणि सनियंत्रणाही योजनेचे नियोजन व अंमलबजावणी आणि सनियंत्रणाची जबाबदारी नियोजन व अंमलबजावणी आणि सनियंत्रणाप्रणालीची जबाबदारी मिळालेली आहे. त्यामुळे स्थानिक लोकप्रतिनिधीची आणि प्रशासकिय अधिकाऱ्यांना योजनेचा उपयोग कल्पकपणे विकासासाठी करून घेण्याची संधी निर्माण झाली. ग्रामपंचायतीला या जबाबदाऱ्या नीट पार पाडता याव्यात यासाठी निधी बरोबर मनुष्यबळही उपलब्ध करून देण्याची तरतूद या कायदयाने केली आहे. कामाच्या ठिकाणी मुकादम, ग्रामपंचायतीचे रोजगार सेवक ग्रामपंचायतीच्या आकारानुसार लेखा अधिकारी अशी पदे त्यासाठी निर्माण केलेली आहे. थोडक्यात पंचायतराज संस्थेच्या सर्वात खालच्या स्तराचे सक्षमीकरण करण्यासाठी या कायदयाने अनेक महत्वाच्या तरतुदी केल्या आहेत. या योजने मार्फत पाणलोट विकास वर्गीकरण वृक्ष लागवड अशा विविध प्रकारची बांधबदीस्ती, पडीत जमिन विकास, डोंगर विकास, पाझर तलाव गाळ काढणे, नाले ओढे कालवे याची खोली वाढविणे रोजगार हमी योजनेशी संबंधीत कामासाठी पुरेशी जागा असावी.

प्रत्येक कुटूंबाला २०० दिवसाचा रोजगार उपलब्ध करून देण्याचा निधी केंद्र शासन पुरविते रोजगार हमी योजनेमुळे ग्रामीण भागातील नागरिकांच्या जीवनात मोठया प्रमाणात बदल / सुधार झालेला आहे. रोजीतील काम करण्याची कला रोजगार हमीकडे वळविलेले आहे.

Research Hub International Journal

**रोजगार हमी योजनेचे उद्दिष्टये :**

- गरजु व्यक्तींना त्यांच्याच परिसरात काम मिळवून देणे.
- गरीब मजूराला आत्मसन्मानाने कमविण्याची संधी.
- गावात मूलभूत संसाधनाची निर्मिती करणे.
- कल्याणकारी योजना व विकास योजना यांचा सर्वात शेवटच्या व्यक्तीसाठी करणे.
- गावातील काम गावकऱ्यांच्या सहभागाने होत असते.

**अध्ययन पध्दती :**

**समस्या सुत्रण :**

**“ महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदयाअंतर्गत काम करणाऱ्या मजुरांचे अध्ययन’)**

**विशेष संदर्भ :**

**जिवती तालुक्यातील केळेझारी गावातील रोजगार हमी कायदयाअंतर्गत काम करणारे मजुर लाभार्थी.**

**प्रारंभिक प्रश्न :**

- मजूर लाभार्थ्यांची वैयक्तिक, कौटूंबिक स्थिती कशी असेल?
- मजूर लाभार्थ्यांची आर्थिक स्थिती कशी असेल?
- मजुर लाभार्थ्यांची शैक्षणिक स्थिती कशी असेल?
- मजूर लाभार्थ्यांना म.गा.रा. ग्रामीण रोजगार हमी कायदयाअंतर्गत माहिती असेल का?
- मजूर लाभार्थ्यांना महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी कायदयाअंतर्गत काम करीत असतांना कोणत्या अडचणी येत असतील?
- मजूर लाभार्थ्यांचे महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदया अंतर्गत मिळणाऱ्या कामाबाबतचे मत कसे असेल?
- मजूर लाभार्थ्यांची मजूरी थेट बॅक खात्यात जमा होत असेल का?
- योजनेमुळे आर्थिक स्थितीत बदल झाला असेल का?

**उद्देश :**

१) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कादया अंतर्गत काम करणाऱ्या मजूर लाभार्थ्यांच्या वैयक्तिक, कौटूंबिक व शैक्षणिक माहिती जाणून घेणे.

२) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदया अंतर्गत काम करणाऱ्या लाभार्थ्यांची आर्थिक स्थिती जाणून घेणे.

Research Hub International Journal

३) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदया अंतर्गत काम करणाऱ्या लाभार्थ्यांना येणाऱ्या विविध अडचणीचा अभ्यास करणे.

४) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदयामुळे लाभार्थ्यांच्या आर्थिक स्थितीत झालेले परिवर्तन अभ्यासणे.

५) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदया अंतर्गत गावात झालेली विकास कामे अभ्यासणे.

**उपकल्पना / गृहीतकृत्य :**

उपकल्पना म्हणजे प्रारंभिक प्रश्नाला मिळालेले अचुक किंवा संभाव्य उत्तर होय. जी विधानाच्या स्वरूपात संशोधनाच्या पूर्वी मांडण्यात येतात व त्यांचा पडताळा संशोधन झाल्यानंतर करण्यात येतो. उपकल्पना ही संशोधन प्रश्नांची व संशोधनाच्या उद्देशाशी सबंधीत असतात.

१) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदया अंतर्गत काम करणाऱ्या मजुरांची वैयक्तिक, कौटूंबिक व शैक्षणिक स्थिती सामान्य स्वरूपाची आहे.

२) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदया अंतर्गत काम करणाऱ्या लाभार्थ्यांची आर्थिक स्थिती सामान्य आहे.

३) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदया अंतर्गत काम करणाऱ्या लाभार्थ्यांना विविध अडचणी येतात.

४) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदया अंतर्गत कामामुळे लाभार्थ्यांच्या आर्थिक स्थितीत बदल झाला.

५) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदया अंतर्गत ग्राम विकासाची कामे झाली.

**अध्ययनाचे क्षेत्र :**

प्रस्तुत संशोधनात संशोधनकर्त्यांला जिवती तालुक्यातील केकेझरी हे गाव संशोधनाचे क्षेत्र आहे.

**अध्ययनाचे विश्व :**

अध्ययनाचे विश्व हे जिवती तालुक्यातील केकेझरी गावातील ग्रामपंचायती मधील नोंदणीकृत रोजगार हमी योजनेचे काम करणारे एकुण १८० लाभार्थी मजूर हे या अध्ययनाचे विश्व व एकक आहे.

**नमुना निवड :**

प्रस्तुत अध्ययनामध्ये केकेझरी गावातील ग्रामपंचायतीमध्ये नोंदणीकृत महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदयाअंतर्गत लाभ घेणाऱ्या एकुण लाभार्थ्यांची संख्या ही १८० असून त्यातील ६० एककांची निवड ही संभाव्यता नमुना निवड पध्दती अंतर्गत सरल यादृच्छिक नमुना तंत्रातील नियमित अंकन प्रणालीचा

Research Hub International Journal

वापर करून तीनच्या अंतराने एककाची निवड केली आहे. अशा प्रकारे एकुण ६० नमुन्याची निवड प्रस्तुत अध्ययनासाठी करण्यात आली.

**तथ्य संकलन :**

**तथ्य संकलनाचे दोन प्रकार :**

**प्राथमिक स्त्रोत :**

संशोधक स्वत: अध्ययन क्षेत्रात जाऊन पहिल्यांदाच तथ्य गोळा करणे होय. हे कार्य संधोधक संशोधान क्षेत्रात जाऊन तथ्य गोळा करतो म्हणून त्या स्त्रोतास क्षेत्रीय स्त्रोत असे म्हणतात. त्यासाठी संरचीत अनूसूची मुलाखत अनुसूची या माध्यमाचा संशोधक उपयोग करतो. या सर्वांना प्राथमिक स्त्रोत असे म्हणतात. या सरचित मुलाखत अनुसूची द्वारे प्राथमिक तथ्यांचे संकलन करण्यात आले, यामध्ये मुक्त तसेच बंधीस्त प्रश्नांचा समावेश करण्यात आलेला आहे.

**दुय्यम स्त्रोत :**

दुय्यम स्त्रोतामध्ये संशोधक उत्तरदात्याशी प्रत्यक्ष संपर्क स्थापित करू शकत नाही. पुस्तके, मासिके, लेख याचा आधार घेण्यात आला. तसेच याद्वारे संशोधन विषयाशी संबंधीत माहिती संकलीत करण्यात आलेली आहे.

**तथ्य प्रक्रियन :**

संशोधनासाठी संकलीत केलेल्या तथ्यावर प्रक्रिया आवश्यक असते. त्यास तथ्यच्या आकडेवारीवर प्रक्रिया करणे आवश्यक असते. त्यास तथ्य प्रक्रियन म्हणतात.

१. संस्करण

२. वर्गीकरण

३. संकेतीकरण

४. संकेत पुस्तीका

५. मास्टर चार्ट

६. सारणीयन

या पायऱ्यांचा अवलंब करून संकलीत तथ्यांचे प्रक्रीयन करण्यात आले.

**संकल्पना :**

आपल्याला जे अनुभव येतात ते स्पष्ट करण्याची भुमिका म्हणजे संकल्पना होय.

**अनैपचारीक संकल्पना :**

**रोजगार हमी योजना :**

- रोजगार नसलेल्यासाठी वर्षातील किमान ठराविक दिवस रोजगाराची हमी देणारी योजना रोजगार हमी योजना म्हणून ओळखल्या जाते.
- ''रोजगार हमी योजना हे एक मजुरी देणारे माध्यम असून त्या मजुरीवर मजुर आपला उदरनिर्वाह करीत असतो.
- ''दुष्काळाच्या काळात मजुरांना दिली जाणारी कामाची हमी म्हणजे रोजगार हमी होय''

**लाभार्थी :**

''१८ ते ६० वयोगटातील व्यक्तीने व ग्रामपंचायतीमध्ये जॉबकार्ड काढलेले आहेत, अशा व्यक्तीस लाभार्थी असे म्हणतात.

**मजुर :**

''जो व्यक्ती काम करण्यासाठी विशिष्ट स्थळावर जावून काम करण्याची प्रक्रिया पूर्ण करतो व त्याचा उपयोग तो स्वत:च्या जीवन जगण्यासाठी सतत करीत असतो, अशा व्यक्तीस मजुर असे म्हणतात.''

श्रमाचा समावेश घेवून काम करणाऱ्या व्यक्तीस मजूर असे म्हणतात.

**संशोधन आराखडा :**

संशोधनात अंशत: वर्णनात्मक आणि अंशत: निदानात्मक संशोधन आराखडयाचा वापर करण्यात आले, यामध्ये संशोधन विषय अनुषंगाने लाभार्थ्यांच्या वैयक्तिक, कौटूंबिक, आर्थिक स्थितीचे तसेच रोजगार हमी कायदया विषयी वर्णन करून या कायदयाच्या लाभामुळे झालेल्या परिवर्तनाबाबत काही निदान काढण्यात आले.

**साहित्याची पळताळणी :**

साहित्याचा पडताळा करीत असतांना संशोधनकर्त्याने पुर्वी झालेल्या संशोधनातील निष्कर्षाची पडताळणी करीत असतो, यामध्ये संशोधक पुस्तके, मासिके, वर्तमानपत्र यात प्रकाशित झालेल्या लेखाचा आढावा घेण्यात आली, व संशोधन साहित्याचा पडताळा करण्यात आला. तसेच प्रत्यक्ष भेट घेऊन माहिती घेण्यात आली.

**विषयाची व्याप्ती /महत्व :**

**व्याप्ती :**

प्रस्तुत अध्ययनाची व्याप्ती ही अप्रत्यक्षपणे व प्रत्यक्षपणे अध्ययनाच्या उद्देशातून व उपकल्पनेतून स्पष्ट झाली आहे. या विषयाची व्याप्ती फक्त जिवती तालुक्यातील केकेझरी गावातील रोजगार हमी योजनेच्या मजुरा पर्यंत मर्यादीत आहे.

**महत्व :**

महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी कायदा गावातील लाभार्थ्यांना या योजनेचा वापर योग्य प्रमाणात होत आहे की नाही या विषयाबाबत जिवती तालुक्यातील केकेझरी गावातील लाभार्थ्यांचे प्रश्न आणि त्यांचे मत जाणून घेवुन महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी कायदा व त्याची अंमलबजावणी विषय स्थिती व अंमलबजावनीतुन लाभार्थ्यांच्या वैयक्तिक, कौटूंबिक, सामाजिक व आर्थिक स्थितीत झालेल्या बदलाचे अध्ययन करून संशोधन निष्कर्ष काढण्यात आले आहेत. ज्यांचा उपयोग शासनास तसेच नागरीकांना होईल. तसेच यांच्या अंमलबजावणीमध्ये येणाऱ्या अडचणीचे देखील अध्ययन करून संशोधन निष्कर्ष काढण्यात आले ज्याचा उपयोग प्रशासनास होईल.

## प्रमुख शोध :

सर्वाधिक उत्तरदाते ३५ च्या वर या वयोगटातील ४३ असुन त्यांची टक्केवारी ७१.६७ टक्के आहे, जास्तीत जास्त लाभार्थी पुरूष असुन यांची वारंवारीता ४४ असून त्यांची टक्केवारी ७३.३३ आहे, जास्तीत जास्त २९ उत्तरदाते ओपन जातीच्या प्रवर्गातील असून त्यांची टक्केवारी ४८.३३ टक्के आहे. जास्तीत जास्त ४८ उत्तरदात्यांची मातृभाषा मराठी असून त्यांची टक्केवारी ८०.०० आहे. जास्तीत जास्त उत्तरदात्याची संख्या ५९ असुन त्यांची टक्केवारी ९८.३३ टक्के आहे, जास्तीत जास्त उत्तरदाते २८ असून ते प्राथमिक शिक्षण घेतलेले असून त्यांची टक्केवारी ४६.६७ टक्के आहे. जास्तीत जास्त ३१ उत्तरदात्यांच्या घराचा प्रकार हा पक्के असून त्यांचे त्यांची टक्केवारी ५१.६७ टक्के आहे. जास्तीत जास्त ३७ उत्तरदात्यांचा कुटूंबाचा प्रकार विभक्त असून त्यांची टक्केवारी ६१.६७ टक्के आहे. सर्वाधिक ५२ उत्तरदाते विवाहित असून त्यांची टक्केवारी ८६.६७ टक्के आहे. जास्तीत जास्त आधार कार्ड असलेले उत्तरदात्ते हे ३७ असुन यांची टक्केवारी ६१.६७ टक्के आहे. सर्वाधिक उत्तरदाते हे वार्षिक उत्पन्न रू.२०,००० ते २९,९९९ हजाराच्या दरम्यान असून त्या उत्तरदात्यांची वारंवारीता ही ३७ असून टक्केवारी ६१.६६ आहे, सर्वाधिक उत्तरदात्यांकडे शेती आहे त्यांची वारंवारीता ४७ असून टक्केवारी ७८.३३ आहे.

सर्वाधिक उत्तरदात्यांपैकी शिक्षणाची सोय आहे असे म्हणणे ४९ उत्तरदाते असून त्यांची टक्केवारी ८१.६७ आहे, सर्वाधिक ४९ उत्तरदात्यांचे शिक्षण सातवी पर्यंत झालेले असून त्यांची टक्केवारी ८१.६६ टक्के आहे. सर्वाधिक उत्तरदाते हे उच्च शिक्षणासाठी बाहेर गावी नाही असे म्हणणारे असून त्यीची वारंवारीता ४६ असुन त्यांची टक्केवारी ७६.६७ टक्के आहे. सर्वाधिक ४६ उत्तरदात्याच्या मते गावात प्राथमिक आरोग्य केंद्र आहे हे असुन त्यांची टक्केवारी ७६.६७ टक्के आहे. सर्वाधिक ५४ उत्तरदात्यांच्या मते आरोग्य विषयक सुविधा मिळतात असे म्हणणारे असुन त्यांची टक्केवारी ९०.०० टक्के आहे. सर्वाधिक ५० उत्तरदात्यांच्या मते उपकेंद्रामध्ये डॉक्टर / नर्स उपलब्ध नसतात असे म्हणणारे असुन त्यांची टक्केवारी ८३.३३ टक्के आहे.

सर्वाधिक ४० उत्तरदात्यांच्या मते डॉक्टर /परिचारिका कडुन रूग्णांना काही गैरवर्तन देत नाही असे

Research Hub International Journal

म्हणणारे असुन त्यांची टक्केवारी ६६.६७ टक्के आहे. सर्वाधिक ४८ उत्तरदात्यांच्या मते मजुरांना आरोग्य विषयक काही अडचणी नाहीत असे म्हणणारे असुन त्यांची टक्केवारी ८०.०० टक्के आहे.

जास्तीत जास्त उत्तरदाते रोजगार हमी कायदयाबाबत ग्रामपंचायतीकडून महिती दिली जाते असे म्हणणारे असुन त्यांची टक्केवारी ९३.३३ टक्के आहे. जास्तीत जास्त ४९ उत्तरदात्यां मते रोजगार हमी कायदयाची माहिती दवंडी देवुन देतात असे म्हणणारे असून त्यांची टक्केवारी ८१.६७ टक्के आहे जास्तीत जास्त ३४ उत्तरदात्यां मते महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी कायदयाचे काम करण्यासाठी मजुर लाभार्थ्यांना ग्रामपंचायतीकडे कामाची मागणी केली असून त्यांची टक्केवारी ५६.६७ टक्के आहे जास्तीत जास्त ४९ असून महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी कायदयाचे लाभ घेताना कामाची पोच पावती दिली जात नाही असे असून त्यांची टक्केवारी ८१.६७ टक्के आहे जास्तीत जास्त ५३ उत्तरदात्यांच्या मते महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी कायदया अंतर्गत कामाची मागणी केल्यास १५ दिवसात काम मिळते असे म्हणणारे असून त्यांची टक्केवारी ८८.३३ टक्के आहे जास्तीत जास्त ४१ उत्तरदात्याना ३६५ दिवस काम मिळत असून यांची टक्केवारी ६८.३३ आहे. जास्तीत जास्त ७ तास काम करणारे उत्तरदाते ४५ असून त्याची टक्केवारी ७५.०० आहे. जास्तीत जास्त ५२ उत्तरदात्यांच्या मते कामाचे मोजमाप २ दिवसात घेतल्या जात असून त्याची टक्केवारी ८६.६७ आहे. जास्तीत जास्त ४४ उत्तरदात्यांना ५ ते ६ किमी अंतरावर काम मिळत असून यांची टक्केवारी ७३.३३ आहे. जास्तीत जास्त ५३ उत्तरदात्यांच्या मते ५ किमी पेक्षा दुर काम असल्यास प्रवास भत्ता मिळत असून त्यांची टक्केवारी ८८.३३ आहे. जास्तीत जास्त ४४ उत्तरदात्यांच्या मते १५ ते २० दिवसात मजुरी मिळत असून मिळत असून त्यांची टक्केवारी ७३.३३ आहे. जास्तीत जास्त ५५ उत्तरदात्यांच्या मते मजुरी हि बॅक खात्याद्वारे मिळत असून मिळत असून त्यांची टक्केवारी ९१.६७ आहे. जास्तीत जास्त ३९ उत्तरदात्यांच्या मते काम करणाऱ्या मजुराच्या कामाचे मस्टर दररोज भरल्या जाते असे असून त्यांची टक्केवारी ६५.०० टक्के आहे. जास्तीत जास्त ४९ उत्तरदात्यांच्या मते अधिनियम २००५ नुसार मजुरी दिली जाते असे म्हणणारे असून त्यांची टक्केवारी ८१.६७ टक्के आहे. जास्तीत जास्त ४९ उत्तरदात्यांच्या मते मजुरीची पावती दिली जात नाही असे म्हणणारे असून असून त्यांची टक्केवारी ८१.६७ टक्के आहे. जास्तीत जास्त ५३ उत्तरदात्यांच्या मते काम करणाऱ्या मजुर लाभार्थ्याला दिवसाची मजुरी हि २४८ रू. दिली जाते असे म्हणणारे असून त्यांची टक्केवारी ८८.३३ टक्के आहे. जास्तीत जास्त ५० उत्तरदात्याच्या मते कामाचे स्वरूप यापैकी सर्व असून त्याची टक्केवारी ८३.३४ टक्के आहे. जास्तीत जास्त ४३ उत्तरदात्यांच्या मते कामाची मागणी केल्यानंतर १५ दिवसाच्या आत काम न मिळाल्यास बेरोजगार भत्ता मिळतो असे म्हणणारे असून त्यांची टक्केवारी ७१.६७ टक्के आहे. जास्तीत जास्त ३१ उत्तरदात्यांच्या मते कामाच्या ठिकाणी अपघात झाल्यास उपचार मिळत नाही असे म्हणणारे असून त्याची टक्केवारी ५३.६७ टक्के आहे. जास्तीत जास्त ४७ उत्तरदात्यांच्या मते कामाच्या ठिकाणी अपघात झाल्यास उपचारासाठी प्रमिोपचार पेटी नाही असे म्हणणारे असून त्याची टक्केवारी ७८.३३ टक्के आहे. जास्तीत जास्त ५५ उत्तरदात्यांच्या मते कामासाठी लागणाऱ्या साधानाच्या पजाईचे पैसे मिळतात असे म्हणणारे असून त्यांची टक्केवारी ९१.६७ टक्के आहे. जास्तीत जास्त ५८ उत्तरदात्यांच्या मते मजुर लाभार्थ्यांना कडुन रोजगार सेवक पैशाची मागणी करीत नाही असे म्हणणारे असून त्याची टक्केवारी ९६.६७ टक्के आहे. जास्तीत जास्त ५५ उत्तरदात्यांच्या मते रोजगार सेवका कडुन गैरवर्तणुक मिळत नाही असे म्हणणारे असून त्याची टक्केवारी ९१.६७ टक्के आहे. जास्तीत जास्त ५८ उत्तरदात्यांच्या मते रोजगार सेवका कडुन गैरवर्तणुक लागू होत नाही असे म्हणणारे असून त्याची टक्केवारी ९६.६७ टक्के आहे. जास्तीत जास्त ४३ उत्तरदात्यांच्या मते कामाच्या ठिकाणी यापैकी सर्व सोई

Research Hub International Journal

सुविधा मिळतात असे म्हणणारे असून त्याची टक्केवारी ४३.०० टक्के आहे. जास्तीत जास्त ४७ उत्तरदात्यांच्या मते रोजगार हमी च्या कामातुन अंशत: समाधानी आहे असे म्हणणारे असून त्यांची टक्केवारी ७८.३३ टक्के आहे.

जास्त ५३ उत्तरदात्यांच्या मते रोजगार हमी च्या कामातुन आर्थिक स्तर अंशत: उंचावला असे म्हणणारे असून त्यांची टक्केवारी ८८.३३ टक्के आहे. जास्तीत जास्त ४० उत्तरदात्यांच्या मते रोजगार हमी योजनेचा लाभ सन २००९ पासुन घेण्यात आला असे म्हणणारे असून त्याची टक्केवारी ६६.६७ टक्के आहे. जास्तीत जास्त ४३ उत्तरदात्यांच्या मते योजने मध्ये कौटूंबिक खर्च भागत नाही असे म्हणणारे असून त्याची टक्केवारी ७१.६७ टक्के आहे. जास्तीत जास्त ३७ उत्तरदात्यांच्या मते रोजगार हमी योजनेच्या कामातुन ४,००० रूपये प्राप्त होतात. असे म्हणणारे असून त्याची टक्केवारी ६१.६७ टक्के आहे. जास्तीत जास्त ४६ उत्तरदात्यांच्या मते रोजगार हमी योजनेमुळे कौटुंबिक विकास अंशत: झाला असे म्हणणारे असून त्यांची टक्केवारी ७६.६७ टक्के आहे. जास्तीत जास्त ५४ उत्तरदात्यांच्या मते रोजगार हमी योजनेच्या कामाच्या ठिकाणी वादविवाद होत नाही असे म्हणणारे असून त्याची टक्केवारी ९०.०० टक्के आहे. जास्तीत जास्त ४६ उत्तरदात्यांच्या मते रोजगार हमी योजनेतुन मुलभूत संसाधनाची निर्मिती केली जाते असे म्हणणारे असून त्यांची टक्केवारी ७६.६७ टक्के आहे. जास्तीत जास्त ५१ उत्तरदात्यांच्या मते रोजगार हमी योजनेतुन गावात पायाभूत सुविधा निर्माण होतात असे म्हणणारे असून त्यांची टक्केवारी ८५.०० टक्के आहे. जास्तीत जास्त ५३ उत्तरदात्यांच्या मते रोजगार हमी योजनेतुन शेतकऱ्यांची वैयक्तिक कामे होतात असे म्हणणारे असून त्यांची टक्केवारी ८८.३३ टक्के आहे. जास्तीत जास्त ५३ उत्तरदात्यांच्या मते रोजगार हमी योजनेतुन गोठा बांधकाम होत असते असे म्हणणारे असून त्यांची टक्केवारी ८८.३४ टक्के आहे. जास्तीत जास्त ४६ उत्तरदात्यांच्या मते रोजगार हमी योजनेतुन शेतीची कामे होतात असे म्हणणारे असून त्यांची टक्केवारी ७६.६७ टक्के आहे. जास्तीत जास्त ५४ उत्तरदात्यांच्या मते रोजगार हमी योजनेतुन शेतीच्या बांधावर नाली काढली जाते असे म्हणणारे असून त्यांची टक्केवार ९०.०० टक्कआहे.

**उपकल्पनाचा पडताळा :**

१) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदया अंतर्गत काम करणाऱ्या मजुराची वैयक्तिक, कौटूंबिक व शैक्षणिक स्थिती सामान्य स्वरूपाची आहे, सत्य ठरली आहे.

२) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदया अंतर्गत कामामुळे लाभार्थ्यांच्या आर्थिक स्थितीत बदल झाला आहे, हि उपकल्पना सत्य ठरली आहे.

३) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदया अंतर्गत कामामुळे लाभार्थ्यांना विविध अडचणी येतात हि उपकल्पना सत्य ठरली आहे.

४) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदया अंतर्गत कामामुळे लाभार्थ्यांच्या आर्थिक स्थितीत बदल झालेला आहे, हि उपकल्पना सत्य ठरली आहे.

५) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदया अंतर्गत गावात विकासाची कामे झाली हि उपकल्पना सत्य ठरली आहे.

Research Hub International Journal

**निष्कर्ष :**

१) लाभार्थ्यांची वैयक्तिक, कौटूंबिक स्थिती साधारण आहे.

२) लाभार्थ्यांचे प्राथमिक शिक्षण पुर्ण झालेले आहे.

३) लाभार्थ्यांची आर्थिक स्थिती साधारण आहे.

४) लाभार्थ्यांना महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदया बाबत जागृरूकता नाही.

५) लाभार्थ्यांना महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदयामध्ये काम करीत असतांना अडचणी येतात.

६) लाभार्थ्यांचे कामाबाबतचे मत चांगले आहेत.

७) गाव विकासाकरीता स्थानिक लाभार्थ्यांकरीता ग्रामपंचायत निधी खर्च करीत नाहीत.

८) लाभार्थ्यांना कामाच्या ठिकाणी सोय व सुविधा मिळत नाहीत.

९) लाभार्थ्यांचे मजुरी वेळेवर बॅंक खात्यात जमा होत नाही.

१०) योजनेमुळे आर्थिक स्थितीत बदल साधारण प्रमाणात झाला आहे.

११) या योजनेमुळे ग्रामीण भागातील बेरोजगारी कमी होईल.

**सुचना व शिफारशी :**

१) लाभार्थ्यांना महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदयाविषयी जाणीव जागृरूकता निर्माण व्हावी. यासाठी शासनाने प्रशिक्षण कार्यक्रम राबवावे.

२) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदया अंतर्गत काम करणाऱ्या

लाभार्थ्यांनासाठी योजनेची माहिती व्हावी यासाठी ग्राम पंचायतीमध्ये सुचना फलक लावावे.

३) महागाई नुसार शासनाने महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदया अंतर्गत काम करणाऱ्या लाभार्थ्यांच्या मजुरीमध्ये वाढ करण्यात यावी.

४) लाभार्थ्यांना शारिरीक इजा पोचु नये म्हणुन त्यांना सुरक्षा साधने पुरविण्यात यावे.

५) या योजनेत युवकांचा जास्तीत जास्त समावेश होण्यासाठी शासनाने प्रयत्न करावे.

६) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदया अंतर्गत काम करणाऱ्या मजुराच्या कामाच्या ठिकाणी प्रथोमपचार पेटी उपलब्ध करून दयावी.

७) ग्राम सभेतुन गावाच्या विकासा बाबत १०० टक्के निर्णय घेवुन त्यांची अंमलबजावणी करण्यासाठी प्रयत्न करावे.



Research Hub International Journal

८) या योजनेतुन गावाच्या विकासाकरीता काम केले जावे व पायाभुत सुविधा निर्माण करण्यात याव्या.

९) गावातील सर्व व्यक्तीकडे जॉब कार्डची व्यवस्था करून देण्यात यावी. जेणे करून सर्वांना काम करण्याची संधी मिळेल.

१०) ग्रामपंचायती द्वारा लाभार्थ्यांना रोजगार हमी कायदयाविषयी परिपूर्ण माहिती देण्यात यावी.

११) काम मागणीचा अर्ज सहजरित्या ग्राम पंचायतस्तरावर उपलब्ध करून दयावा.

१२) कामाचे मोजमाप कामाच्या ठिकाणी मजुरांच्या समोर करण्यात यावे.

१३) १५ दिवसाच्या आत जर काम लाभार्थ्यांना उपलब्ध करून दिले नाही तर बेरोजगार भत्ता हा सक्तीने देण्याचे ठरवावे.

१४) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदया अंतर्गत काम करणाऱ्या मजुरांची मुजरी ही एका आठवडयात विलंब न करता त्यांच्या बॅंक खात्यात जमा करावी.

**संदर्भ ग्रंथसूची :**


- आगलावे प्रदिप, (२०००) समाजकार्य संशोधन पध्दती शास्त्र व तंत्रे, विदया प्रकाशन, नागपूर
- बोधनकर सुधिर, विवेक अलोणे (१९९४) सामाजिक संशोधन पध्दती साईनाथ प्रकाशन, नागपूर
- मेश्राम सुरेश, (२०००) प्रात्यक्षिक सामाजिक संशोधन, यश प्रकाशन, मानेवाडा पुर्व नागपूर —३४
- कऱ्हाडे डॉ. बी. एम. सामाजिक संशोधन पध्दती, (२०००) —श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर
- राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियम—२००५, महाराष्ट्र शासना मार्फत प्रकाशित केले पुस्तक, सन जुन २००८


Research Hub International Journal